# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 12 / 03 / 2024 (मंगळवार) सकाळ**


---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दि. १२/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदारांकडुन विश्वसनिय खबर मिळाली की, तुमसर कडुन रामटेक रोडने एका पांढरा रंगाचा मुंडा आणि लाल रंगाचा डाला असलेल्या मालवाहक १० चक्का ट्रक मध्ये कत्तलीकरीता अवैध्यरित्या जनावरांची वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून बसस्टॉप रामटेक समोर नाकाबंदी केली असता तुमसर कडुन येणाऱ्या रोडने एक पांढरा रंगाचा मुंडा आणि लाल रंगाचा डाला असलेला ट्रक येतांना दिसला. नाकाबंदी करतांना पाहुन सदर ट्रकचा चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक नाकाबंदी चालु असलेल्या ठिकाणापासुन अंदाजे ५०० मिटर अगोदरच थांबविले आणि सदर ट्रकचा चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने पळवुन हिवरा हिवरी गावाकडे नेत असतांना कॅनलचा जवळ त्याचे ताब्यातील ट्रक रोडच्या बाजुला लावुन पळुन गेला. सदर ट्रकची पाहणी केली असता सदर ट्रक क्र. MH 35 AJ 1233 च्या मागच्या डाल्यात १) पांढऱ्या रंगाचे ९ नग बैल किंमती १२,०००/— रु. प्रति नग प्रमाणे एकुण १,०८,०००/— रू., आणि पांढऱ्या रंगाचे ४ नग गोरे किंमती १०,०००/— रु. प्रति नग प्रमाणे एकूण ४०,०००/— रू., २) काळे पांढरे रंगाचे ७ नग गोरे किंमती १०,०००/— रू प्रति नग प्रमाणे एकुण ७०,०००/— रू., ३) लाल रंगाचे २ नग बैल किमती १२,०००/— रु. प्रति नग प्रमाणे एकूण २४,०००/— रू., आणि लाल रंगाचे ७ नग गोरे किंमती १०,०००/— रू. प्रति नग प्रमाणे एकूण ७०,०००/— रु. ४) भुरा रंगाचे २ नग गोरे किंमती १०,०००/— रु. प्रति नग प्रमाणे एकुण २०,०००/— रू. ५) तांबुस रंगाचा १ नग गोरा किंमती १०,०००/— रू. असे एकुण ३२ जनावरे एकुण किंमती ३,४२,०००/— रू. आणि टाटा कंपनीचा १० चक्का ट्रक क्र. MH 35 AJ 1233 किंमती २०,००,०००/— रू. असा एकुण २३,४२,०००/— रु. चा माल मिळुन आल्याने ट्रक मधील जनावरांची कोणत्याही प्रकारची चारापाण्याची सोय न करता जनावरांना क्लेशपणे व निर्दयतेने डाल्यामध्ये कोंबुन त्यांचे हात पाय व तोंड दोरीच्या सहाऱ्याने बांधुन कत्तलीकरीता वाहतुक करतांना दिसुन आल्याने आरोपी टाटा कंपनीचा १० चक्का ट्रक क्र. MH 35 AJ 1233 चा फरार चालक यांचेविरूद्ध कलम प्राणी छळ अधि. ११(१), (३), (५), महा. प्राणी सर. अधि., सहकलम ५ (अ). (१), (ब), (५) सहकलम १८४ गोवाका, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जनावरांना चारापाण्यासाठी व देखभालीसाठी गो. विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार, ता. रामटेक जि. नागपूर येथे जमा करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार, पोहवा अमोल इंगोले, गजू माहुरे, पोना मंगेश सोनटक्के, प्रफुल रंधई, पोअं शरद गिते, धिरज खंते, रुपेश राठोड यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर